# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ८६ गुरूवार दि.०९ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा पातळीवर समिती



मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीची रणनीती ठरली आहे. महायुती राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा पातळीवर समिती निर्माण करणार आहे. या समितीत पालकमंत्री व दोन्ही पक्षांचे नेते असणार आहेत. सोबतच जिल्ह्यातील आमदार व इतरही असणार आहेत.

जिल्हा पातळीवरील समिती पुढील आठ दिवसांत जिल्ह्यातील निवडणुकींच्या अनुषंगाने अहवाल तयार करणार आहे. या अहवालात जिल्ह्यातील परिस्थिती, महायुती आणि महायुतीअंतर्गत असलेल्या पक्षाची ताकद आणि परिस्थिती याचा ही आढावा असणार आहे. तसेच ज्या जिल्ह्यात महायुती अंतर्गत वादाची सविस्तर माहिती मांडणार आहे. हा संपूर्ण अहवाल, आढावा जिल्हा समन्वय समिती राज्य समिती समोर पुढील आठ दिवसात मांडणार आहे.

राज्य सरकारकडे अहवाल आल्यानंतर ज्या ठिकाणी वाद असतील त्या ठिकाणचे निर्णय महायुतीचे मुख्य नेते घेतील. कोणत्याही ठिकाणी जाहीरपणे तणाव निर्माण होणार नाही, याची काळजी राज्य समन्वय समितीकडून घेतली जाईल.

निवडणुकीत आरक्षणाची प्रक्रिया चक्राकार

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आरक्षणाची प्रक्रिया चक्राकार पद्धतीने सुरू ठेवण्याचे सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभाग रचनेतील आरक्षणाबाबतचे नियम राज्य शासनाने बदलले आहेत. या बदललेल्या नियमांचा थेट शासन निर्णय राज्य सरकारने २० ऑगस्ट २०२५ ला याविरोधात दाखल विविध याचिका फेटाळून लावत सुप्रीम कोर्टाने २५ सप्टेंबर २०२५ शासनाच्या नियमात हस्तक्षेपास नकार दिला होता. यानंतर आज यासंदर्भात सुधारित आदेश सुप्रीम कोर्टाने दिला आहे. यामध्ये केवळ मध्य प्रदेशचा उल्लेख असलेला एकच बदल करण्यात आला असून जुन्या आदेशातील महाराष्ट्राच्या संदर्भातील आदेश कायम ठेवण्यात आला आहे.

## माळेगाव येथे तुळजाभवानीच्या यात्रेनिमित्त १३ बैलगाड्या ओढल्या देवीच्या दर्शनाला भाविकांची गर्दी



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील माळेगाव येथील ग्रामदैवत तुळजाभवानी मातेची दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कोजागिरी पौर्णिमे निमित्त यात्रा भरली होती. या निमित्ताने भाविक भक्तानी यावेळी माणसांनी खचा खच भरलेल्या १३ बैलगाड्या ओढल्या. या यात्रेसाठी व देवीच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतुन आलेल्या भाविकांमूळे मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. तुळजापूरच्या कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे माळेगाव येथे ठाणं असून ही देवी हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. देवीच्या मंदिरात नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. माळेगाव येथील देवींची घटस्थापने पासून पंधरा दिवस विविध धार्मिक व संस्कृतिक कार्यक्रमाने यात्रा भरते. कोजागिरी पौर्णिमे निमित्ताने सोमवारी पूजऱ्यांच्या हस्ते पहाटे देवीचे अभिषेक व अलंकार महापूजा करण्यात आली. दुपारी शेकडो महिलांनी पाण्याने भरलेल्या घागरी घेऊन गाड्यांना पाणी घातले. अडीच वाजता 'आई राजा आईचा उदो उदो' या गजरात माणसांनी खचा, खच भरलेल्या १३ बैलगाड्या पाच दिवसापासून मंदिरात निरंकार उपवास करीत बसलेले भक्त लक्ष्मण लोकरे यांनी नागरिकांच्या मादतीने ओढल्या. हा सोहळा पाहण्यासाठी बच्चेकंपनीसह महिला, तरुण, नागरिक व भाविक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. रात्री गावातून देवीच्या पालखीची वाजतगाजत फटाक्यांच्या आतषबाजीत भाविकांनी पोत खेळत देवीच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली.यावेळी आलेल्या सर्व भाविकांना मसाला दूधाचे वितरण करण्यात आले. यात्रेनिमित्त देवीच्या मंदिरावर व प्रमुख रस्त्यावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती.त्यामुळे मंदिर परिसर उजळून निघाला होता. यात्रेत खाद्यपदार्थांचे, सौंदर्य प्रसाधने व लहान मुलांच्या खेळणीचे स्टॉल,रहाट पाळणे व इतर मनोरंजनाच्या साधनांचा आनंद यात्रेकरूंनी घेतला.

## महायुती सरकारची शब्दपूर्ती; अतिवृष्टीबाधितांना समाधानकारक मदत भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकरांनी मानले सरकारचे आभार



लातूर ( प्रतिनिधी ) - लातूर जिल्ह्यासह मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन शेतकरी व नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीबाधितांना मदत मिळावी अशी मागणी करण्यात आलेली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने समाधानकारक मदत देण्याचा शब्द दिला होता. मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय होऊन अतिवृष्टीबाधितांना ३१ हजार ६२८ कोटीचे मदत पॅकेज जाहीर केली आहे. हे पॅकेज जाहीर करून महायुती सरकारने शब्दपूर्ती केली असून अतिवृष्टीबाधितांना समाधानकारक मदत केल्याचे सांगून लातूर भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी मुखमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचे आभार मानले आहेत. लातूर जिल्ह्यासह मराठवाड्यात अतिवृष्टीने शेती पिकासह शेत जमिनींचे मोठे नुकसान होऊन अनेकांच्या जमिनी खरडून व वाहून गेल्या आहेत. त्याचबरोबर पूरस्थितीने नागरिकांच्या घरांचे व संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झालेले होते. अनेकांचे पशुधन मयत झाले तर वाहून सुद्धा गेले आहेत. अतिवृष्टीच्या हाहाकारने शेतकरी व नागरिक हवालदिल झाले होते. या परिस्थितीत शेतकरी व नागरिकांना सरकारकडून मदतीचा हात अपेक्षित होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार याने सातत्याने या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेऊन नुकसानग्रस्तांचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश दिले होते. या प्रसंगी तात्काळ मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आलेली होती. महायुती सरकारने लवकरात लवकर मदत देण्यात येईल असा शब्द दिला होता. सर्वसामान्यांचे सरकार म्हणून काम करणाऱ्या महायुती सरकारने संवेदनशीलपणा दाखवत शब्दपूर्ती करून अतिवृष्टीबाधितांना ३१ हजार ६२८ कोटीचे मदत पॅकेज जाहीर केले आहे. पॅकेज केवळ आपल्यापुरते जाहीर न करता त्याची प्रत्यक्षात याची अंमलबजावणी सुद्धा करण्यास सुरुवात केले असल्याचे सांगून लातूर शहर भाजप जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी मदत पॅकेज जाहीर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचे व महायुती सरकारचे आभार व्यक्त केले आहे. महायुती सरकारची भूमिका शेतकऱ्यांना मोठी आधार देणारी असून अतिवृष्टीबाधितांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांना दिलासा देण्याचे काम केले असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले. या मदतीच्या माध्यमातून संपूर्ण व्यवस्था पुन्हा उभा राहण्यासाठी मोठी मदत होणार असून शेतकरी व नागरिकांना या मुळे नवसंजीवनी सुद्धा मिळणार आहे. महसूल वसुली, कर्ज पूनर्गठन व परीक्षा शुल्क माफ अशा अनेक निर्णयामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. सदर मदत मिळण्यास कोणती अडचण आल्यास किवा मदतीपासून वंचित राहत असल्यास त्यांनी भाजप शहर कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवहान भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले आहे.

## भाजपा नेते रमेशआप्पा कराड - जनसामान्यांचे आमदार! कामगिरी दमदार!!

### शिराळा येथील खचलेल्या रस्त्याचे अवघ्या तीन तासांत मजबुतीकरण; वाहतूक सुरळीत, नागरिकांना मोठा दिलासा







लातूर :- शहरातील शिराळा परिसरातील खचलेल्या रस्त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊन नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या समस्येची तात्काळ दखल घेत भाजपा नेते आणि आमदार रमेशआप्पा कराड यांनी तत्परता दाखवत केवळ तीन तासांच्या आत रस्त्याचे मजबुतीकरणाचे काम पूर्ण करून वाहतूक सुरळीत केली. स्थानिक नागरिकांनी ही समस्या आमदार रमेशआप्पा कराड यांच्यापर्यंत पोहोचवली. त्यानंतर त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क साधून काम सुरू करण्याचे निर्देश दिले. परिणामी काही तासांतच रस्त्यावरील खड्डे बुजवून आणि खचलेला भाग दुरुस्त करून रस्ता पुन्हा वाहतुकीस खुला करण्यात आला. या तत्पर कारवाईमुळे नागरिक, वाहनचालक आणि व्यावसायिकांनी आमदार कराड यांचे कौतुक केले आहे. जनतेच्या अडचणींना विलंब न लावता प्रतिसाद देणे ही आमची जबाबदारी आहे. विकासकामे वेळेत पूर्ण होणे हेच माझे ध्येय आहे, असे आमदार रमेशआप्पा कराड यांनी सांगितले. स्थानिकांनी सांगितले की, रस्ता खचल्यामुळे सकाळपासून वाहतूक ठप्प झाली होती. मात्र आमदार कराड यांच्या हस्तक्षेपामुळे दुपारपर्यंत रस्ता पुन्हा सुरू झाला. अशा प्रतिसादाची आम्हाला नेहमी अपेक्षा असते. या कामामुळे शिराळा परिसरातील वाहतूक पुन्हा सुरळीत झाली असून नागरिकांनी दिलासा व्यक्त केला आहे.

# लिंगायत स्मशानभूमी व स्टॅच्यू ऑफ नॉलेजचे काम तात्काळ मार्गी लावून लातूर शहरातील विकासकामांना गती द्या पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे मनपा प्रशासनाला निर्देश

लातूर प्रतिनिधी - लातूर शहरातील कन्हेरी परिसरात असलेल्या लिंगायत स्मशानभूमीचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला असून हा प्रश्न तात्काळ मार्गी लावून लातूर शहरात उभारण्यात येत असलेल्या स्टॅच्यू ऑफ नॉलेजच्या उभारणी कामास लवकरात लवकर सुरुवात करावी असे निर्देश देऊन शहरातील इतर विकासकामांसाठी आवश्यक असलेल्या सर्व कार्यवाही पुर्ण करून या कामांना गती द्यावी, असे निर्देश पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी मनपा प्रशासनाला दिले आहेत.

शहर जिल्हा भाजपच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी लातूर शहरातील लिंगायत स्मशानभूमी, स्टॅच्यू ऑफ नॉलेज, अंतर्गत भुयारी गटार योजना स्व.विलासराव देशमुख मार्ग, शहरातील बंद पथदिवे व त्यांची दुरुस्ती, अमृत योजना टप्पा २, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, नाट्यगृह, शादिखाना यासह जिल्हा रुग्णालयांच्या कामांबाबत पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी मनपा प्रशासनाची बैठक घेऊन आढावा घेण्यात यावा अशी मागणी केली होती. यानुसार पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात आयोजित केलेल्या आढावा बैठकीत पालकमंत्री बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, अर्चना पाटील चाकूरकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, मनपा आयुक्त मानसी मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, मनपा उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे, माजी शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, गुरुनाथ मगे, शैलेश गोजमगुंडे, दिपक मठपती, रागिणी यादव आदींसह प्रशासकीय अधिकारी, माजी नगरसेवक, पक्ष पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

लातूर शहरातील कन्हेरी परिसरात असलेल्या लिंगायत स्मशानभूमीचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला असून हा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यात यावा अशी मागणी सातत्याने समाजबांधवांकडून होत आहे. समाजबांधवांची भावना व स्मशानभूमीची गरज ओळखून हा प्रश्न सोडवण्यासाठी मनपा प्रशासनाने जिल्हा प्रशासनाला सोबत घेऊन हा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व उपाययोजना कराव्या असे निर्देश पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह मनपा आयुक्तांना दिले आहेत. शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात उभारण्यात येणाऱ्या स्टॅच्यू ऑफ नॉलेजच्या उभारणी कामास तात्काळ प्रशासकीय मान्यता द्यावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले होते. मात्र अद्यापपर्यंत यावर कोणतीच कार्यवाही झाली नाही असे भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी निदर्शनास आणून दिले. स्टॅच्यू ऑफ नॉलेजच्या उभारणी कामास प्रशासकीय मान्यता अद्यापपर्यंत का दिली नाही याचा जाब विचारून मनपा प्रशासनाने या कामात कोणतीही दिरंघाई न करता तत्परतेने काम करावे अशी सूचना पालकमंत्री भोसले यांनी दिली.

लातूर शहरात अमृत योजनेचा दुसरा टप्पा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केलेला असून याबाबत आवश्यक असणारे सर्व प्रस्ताव आणि यासंदर्भात असणारी टिप्पणी तात्काळ नगरविकास विभागात दाखल करावे अशी सूचना देऊन यासाठी आवश्यक असणारा पाठपुरावा करण्यात येईल असे पालकमंत्री भोसले यांनी यावेळी सांगितले. शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुर्णाकृती पुतळ्यानजीक असलेल्या मोकळ्या जागेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह उभारण्यात यावे अशी मागणी होत असून याठिकाणी वाहनतळ होत असले तरी या वाहनतळाच्या वरच्या मजल्यावर सभागृह आणि वाचनालय उभारण्यासाठी आवश्यक असणारा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी तयार करून तो मंजुरीसाठी पाठवण्यात यावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. त्याचबरोबर शहरातील बंद पथदिवे व दुरुस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या निधीचा प्रस्ताव मनपा प्रशासनाने त्वरित तयार करून तो मंजूरीसाठी मंत्रालय स्तरावर पाठवून द्यावा आणि हा मंजूर करण्यासाठी आवश्यक असणारा पाठपुरावाही करण्यात येईल अशी ग्वाही यावेळी पालकमंत्री भोसले यांनी दिली. यासोबतच शहरातील स्व.विलासराव देशमुख मार्ग, नाट्यगृह, शादीखाना ही विकासकामे गतीने पुर्ण करण्यासाठी तातडीने पावले उचलून यासाठी कोणतीही अडचण असल्यास सदर अडचण सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात येईल असा विश्वास देऊन लातूर जिल्हा रुग्णालयाचा भुमिपूजन सोहळा लवकरात लवकर आयोजित करण्यासाठी प्रशासकीय व शासकीय स्तरावर सूचना दिलेल्या असून हा सोहळा लवकरच पार पडेल अशी ग्वाही पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांना दिली.



या बैठकीच्या वेळी अजित पाटील कव्हेकर यांनी सदर विकासकामांबाबत आढावा बैठक आयोजित केल्याबद्दल पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे आभार मानून प्रशासनाने शहरातील विकासकामे अधिक गतीने आणि दर्जेदाररित्या पुर्ण होण्यासाठी विशेष लक्ष देऊन पालकमंत्री यांनी दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी होईल असा विश्वास व्यक्त केला. लातूर शहर व परिसरात गत महिन्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकासह घरांचेही नुकसान झालेले असून या नुकसानीचे पंचनामे लवकरात लवकर पुर्ण होऊन नुकसानग्रस्तांना तात्काळ मदत मिळावी यासाठी प्रशासनाला सूचना देऊन नुकसान भरपाई पासून कोणीही वंचित राहू नये याकरिता प्रशासन सतर्क राहील, अशी अपेक्षा अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केली. यावेळी माजी नगरसेवक व पक्ष पदाधिकारी यांनी मांडलेल्या समस्या आणि सुचनांबाबत जिल्हा प्रशासनाने योग्य कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिली.

## संपादकीय

# श्रीधर वेंबू

तानाजी खोत आज डिजिटल महासत्ता होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करणार्या भारताच्या या यशोगाथेमागे अनेक दूरदर्शी टेक लीडर्सचे परिश्रम आहे. झोहो कॉर्पोरेशनचे संस्थापक श्रीधर वेंबू हे त्यापैकीच एक. तमिळनाडूच्या तेंकासी या छोट्या शहरात सायकलवर फिरताना दिसणार्या या माणसाने अमेरिकेच्या बड्या टेक दिग्गजांना आव्हान दिले आहे. अलीकडेच राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्थलांतरितांच्या कामकाज व्हिसा शुल्कात मोठी वाढ केली. यावर वेंबू यांनी दिलेल्या प्रतिक्रियेमुळे ते चर्चेत आले. एच-१बी व्हिसा शुल्कवाढ हे एक संकट नाही, तर ती एक संधी आहे, असे त्यांनी म्हटले आहे. ते म्हणतात की, मी माझ्या सिंधी मित्रांकडून ऐकलेय, फाळणीच्या वेळी सिंधी लोक सर्व काही सोडून भारतात आले. नव्याने सुरुवात केली आणि कष्टातून यशस्वी झाले. हा निर्णयही तुमच्यासाठी असाच टर्निंग पॉईंट आहे. यामुळे घाबरून जाऊ नका. निर्णय घ्या आणि भारतात या, पुन्हा सुरुवात करा, कदाचित पाच वर्षे लागतील; पण तुम्ही अधिक मजबूत व्हाल.

वेंबू कुणी राजकीय नेते नाहीत. त्यामुळे ते हवेत बोलत नाहीत. त्यांनी स्वतः अमेरिकेतील आकर्षक करिअर नाकारून जन्मभूमीलाच कर्मभूमी मानले. कष्टातून स्वतःचे वेगळे विश्व निर्माण केले. तामिळनाडूच्या ग्रामीण भागात जागतिक कंपन्यांना आव्हान देणारा भारतीय ब्रँड उभा केला. त्यामुळे हे अनुभवाचे बोल आहेत.

आयआयटी मद्रासमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअर आणि नंतर प्रिन्स्टन विद्यापीठातून पीएच.डी. संपादन केलेले वेंबू हे मूळचे तामिळनाडूचे. अमेरिकेत क्वालकॉममध्ये मोठ्या पगाराची नोकरी, जागतिक पटलावर करिअरची संधी, हे सगळं नाकारून ते तामिळनाडूतील तेंकासी या खेडेवजा शहरात आले. तिथे झोहोची स्थापना केली. जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान केवळ महानगरांतूनच निर्माण होत नाही, तर खेड्यातूनही जगाला दिशा देता येते, हे त्यांनी कर्तृत्वाने सिद्ध केले.

२० वर्षे गाजावाजा न करता ते शांतपणे काम करत आहेत. यातून त्यांनी मायक्रोसॉफ्ट आणि सेल्सफोर्ससारख्या दिग्गज कंपन्यांशी स्पर्धा करणारे व्यावसायिक ॲप्लिकेशन्स तयार केले आणि संपूर्ण जगभर ते उपलब्ध केले. सीआरएम, वित्तीय साधने, मानव संसाधन व्यवस्थापन, आयटी सोल्युशन, ऑटोमेशन अशा विविध क्षेत्रांत झोहोचा विस्तार असून ६० देशात त्यांचे १० कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत.

त्यांनी अलीकडेच आणलेले 'अरट्टाई' हे मेसेजिंग ॲप स्वदेशी आणि सुरक्षित प्लॅटफॉर्म म्हणून चर्चेत आले. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी झोहोची उत्पादने वापरत असल्याचे जाहीर करताच अराट्टाई ॲप ट्रेंडिंगमध्ये आले. लाखो भारतीयांनी 'अरट्टाई' डाऊनलोड केले. डाऊनलोडची संख्या रोज वाढत आहे. झोहोचे अत्याधुनिक कस्टमर रिलेशन मॅनेजमेंट (सीआरएम) सोल्युशन्सवर अनेक जागतिक कंपन्यांचा विश्वास आहे. अमेरिकन कंपन्यांना चीनचे दरवाजे बंद असताना झोहोने चीनसह इतरही अनेक देशांचा विश्वास संपादन केला. वेंबू यांच्या प्रेरणेतून एक सुरुवात झाली आहे.


# कांशी तेरी नेक कमाई,तुने सोती कोम जगाई!.

बहुजनांच्या म्हणजे मागासवर्गीय,ओबीसी,आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजाचे राष्ट्रीय पातळीवर समर्थपणे नेतृत्व करेल अशी एक ही व्यक्ती आज राजकीय पातळीवर नाही.हा सर्व बहुजन समाज विविध पक्षात स्वार्थासाठी विभागला आहे, कोणती ही एक ठोस विचारधारा न मानणारा हा बहुजन समाज आज पुन्हा पुन्हा विखुरलल्या जात आहे.आणि त्यांच्यात प्रचंड असंतोष आहे. राज्यात व केंद्रात त्या त्या समाजांचे प्रतिनिधित्व आहे,पण ते स्वाभिमानी नाही,लाचार,गुलामगिरी पत्कारलेल वैचारिक दृष्ट्या अपंगत्व असलेलं आहे. मान्यवर कांशीरामजी यांनी ज्या विश्वासाने बहन मायावती यांच्या कडे बहुजन समाज पक्षाचे नेतृत्व दिले होते. ते कुठे तरी कमी पडले.आज उत्तर प्रदेशाच्या बाहेरच्या राज्यात कांशीरामजी सारखे पक्ष संघटन उभे करण्यास कमी पडते.त्याची सामिक्षा मान्यवर कांशीरामजी यांच्या १९ व्या स्मृतीदिना निमित्त झाली पाहिजे.म्हणून हा लेख प्रपंच.बहन मायावती व विलास गरुड यांनी प्रत्येक वेळी पक्ष संघटना बांधणीची समीक्षा बैठक घेण्याची शिस्त लावली होती.

आज भारतात बहुसंख्य बहुजन समाजातील सर्व जाती मध्ये राजकीय स्पर्धा निर्माण झाली.ते निर्माण करणारे मान्यवर कांशीरामजी यांनी मागासवर्गीय समाजात प्रबोधन केले म्हणून झाली.त्यासाठी ते भारताच्या काश्मीर ते कन्याकुमारी पर्यत गावागावात फिरले.असा माणूस ज्याने ४००० हजार किलोमीटर सायकल चालवुन फुले,शाहू,आंबेडकरांचे विचारांचे प्रबोधन करून आंदोलन उभे करून यशस्वी राजकारण केले.व देशातल्या विमान आणि हेलिकॉप्टर मध्ये फिरून राजकारण करणाऱ्या नेत्यांना निवडणुकाद्वारे आपली ओळख निर्माण करून दाखविली,बहुजन समाजात आत्मविश्वास निर्माण केला. त्यामुळेच एक जोश पूर्ण घोषणा तयार झाली होती. कांशी तेरी नेक कमाई तुने सोती कोम जगाई मात्र आज या घोषणेचा अर्थ आणि सत्यपरिस्थिती पूर्ण बदलली आहे.बहुजन समाजातील जाणकार,राजकारणी काय म्हणतात कांशी तेरी नेक कमाई,किस किसने बेच के खाई मान्यवर कांशीराम यांनी खूप मेहनत करून मागासवर्गीय समाजाला बहुजन समाज म्हणुन संघटित केले त्यासाठी त्यांनी क्रांतिकारी घोषणा दिल्या. त्यामुळे समाजात प्रचंड प्रबोधन झाले.त्या त्या घोषणा सत्ता मिळविण्याच्या स्पर्धेत अर्थपूर्ण बदलल्या त्या घोषणामुळे बहुजन समाजात जनजागृती झाली.त्याच घोषणांचा आज प्रत्येक मतदारसंघात बहुजन समाज म्हणजे आपला बिकाऊ गुलाम मतदार आहे. असा समज वरिष्ठ पक्ष नेतृत्वाला झाला आहे. जिसकी सांख्य भारी उतनी उसकी भागेदारी म्हणायचे आणि ज्याचा पैसे भारी त्याला उमेदवारी देऊन मतदार संख्येच्या हिशेबाने रुपये रोख घ्याचे,हा धंदा झाल्यामुळे बहुजन समाज पक्ष समाजापासुन विचारधारेपासुन दूर गेला आहे. जाती तोडो,समाज जोडो,सर्व जातीचा वैचारिक भाईचारा संपला,आता स्वार्थासाठी युती आघाडी होत असून फक्त राजकारण होत आहे.मग लोक कांशी तेरी नेक कमाई,तुने सोती कोम जगाई!.कुठे गेली असे विचारायाला लागले.

मान्यवर कांशीराम यांचा जन्म १५ मार्च १९३४ ला पंजाब राज्यातील मुक्काम पोस्ट खवासपूर जिल्हा रोपड येथे एका मागासवर्गीय रविदासीय म्हणजेच शीख चर्मकार समाजात झाला होता. त्यांच्या आईचे नांव बिशन कौर आणि वडिलांचे नांव हरिसिंग होते.रोपड येथील शासकीय महाविद्यालयात बी एस्सी पर्यत शिक्षण झाले होते.उच्च ऊर्जा पदार्थ संशोधन प्रयोग शाळा पुणे येथे नोकरीला लागले होते.१९६५ ला केंद्र सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल जन्म दिनाची सार्वजनिक सुट्टी रद्द करण्याचा आदेश काढला होता. त्या आदेशाच्या विरोधात भारत सरकारच्या सेवेत असणाऱ्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी आंदोलन सुरू केले होते. त्या आंदोलनात कांशीरामजी उच्चपदस्थ अधिकारी असून सुद्धा सहभागी झाले. तोच त्यांच्या जीवनातील क्रांतिकारी बदल होता.तिथूनच त्यांचा संघर्ष सुरू झाला. त्यांनी १९७८ साली त्यांनी ऑल इंडिया बॅकवर्ड अँड मायनॉरीटीज कम्युनिटीज एम्प्लेयईज फेडरेशन (बामसेफ) -श्रश्र खपवळर इरलज्ञुरीव रपव चळपीेीूं उेााींपळींळशी एाश्रिेूशशी ऋशवशीरींळेप (इ-चउएऋ) स्थापना केली होती.६ डिसेंबर १९८१ साली त्यांनी दलित शोषित समाज संघर्ष समिती (डी एस-४) ची स्थापना केली.तेव्हा त्यांचा एक लोकप्रिय नारा होता.ब्राम्हण,ठाकूर,बनिया चोर है बाकी सब डीएस फोर है..१४ एप्रिल १९८४ बहुजन समाज पक्षाची स्थापना झाली.हर समस्या कि चाबी सत्ता होती है,म्हणनूच जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी हिस्सेदारी व्होट हमारा राज तुमारा नही चलेगा,नही चलेगा.न बिकणे वाला समाज बनविण्यासाठी त्यांनी चार हजार किलोमीटर सायकलवरून यात्रा कडून प्रबोधन केले. एक नोट एक व्होट,प्रयोग यशस्वी करून दाखविला. होऊ शकत नाही,म्हणणाऱ्यांना होऊ शकते हे करून दाखविले.सर्व समस्या ची ८५ बनाम १५ टक्केची चाबी कुठे हरवली आहे.ती शोधण्याची इच्छाशक्ती आज राजकीय नेतृत्व करणाऱ्या मायावतीसह कोणत्याही राजकीय नेत्यात राहिली नाही.या सर्व घटनाची प्रामाणिकपणे आत्मचिंतन परीक्षण किंवा समीक्षा करण्याची तयारी कोणत्याही नेत्यांची नाही.म्हणून बहुजन समाज पहिल्या पेक्षा आता जास्त संघटनेत विभागला जात आहे.त्यामुळेच संघटीत बहुजन आज असंघटीत बहुजन झाला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पुणे करारावर प्रतिकीर्या देताना सांगितले होते कि संयुक्त मतदार संघ म्हणजे एक गलिच्छ उपनगर ज्या नगराचा उमेदवार ठरविण्याचा अधिकार उच्च वर्णीय लोकांना आहे.आणि त्याचा समाजाचा सत्यानाश करण्यासाठी वापर करने म्हणजेच कांशीरामजीच्या शब्दात चमचा. (आजचे राष्ट्रपती,प्रधानमंत्री ) चमचा हा घराघरात वापरल्या जाणारे हत्यार आहे.जे स्वत कोणतेही काम करू शकत नाही.पुणे करारा नंतर राजकारण्यांनी असेच चमचे मागासवर्गीय,असंघटित,कष्टकरी शोषित पीडित,आदिवाशी आणि अल्पसंख्याक समाजात निर्माण केले.चमचाचा वापर नेहमी आपल्या फायद्या साठीच होतो.त्यामुळे तो कोणाचे नुकसान स्वत करीत नाही कोणाच्या सांगण्या वरून करतो.कांशीराम यांच्या बसपाची बहुजन हिताय बहुजन सुखाय घोषणा जेव्हा मायावतीने सर्वजण हिताय केली तेव्हा सत्ता आल्यावर चमचा आणि हत्यार कसे वापल्या जाते हे दिसून आले.मायावती सत्ता चालविण्यास, समाजाच्या आणि राज्याच्या हिताचे निर्णय घेण्यास समर्थ होत्या.म्हणूनच त्यांनी अनेक विद्यालयाला महाविद्यालयाला महापुरुषाच्या नांवे देऊन वैचारिक समाज क्रांती केली होती.अनेक जिल्ह्याचे नांव सर्व महापुरुष संत महामाताच्या नांवे केले.त्यामुळे मागासवर्गीय समाजात विशेष चमार समाजात क्रांतिकारी बदल हवा होता.पण तो काय बदल झाला नाही?.हे कांशीरामजीचे तत्वज्ञान मायावतीने केवळ सत्ता मिळवण्यासाठी मातीमोल करून ठेवले. हे आता सर्वच कॅडरबेस,बामसेफचे



उच्चशिक्षित अधिकारी खाजगीत म्हणतात. त्यामुळे चमचा युग काय करू शकते २०12 च्या निवडणुकीने बहुजन समाजाला दाखवून दिले.नंतर २०१४,२०१९ च्या निवडणूक निकालाने देशातील चार नंबरची राजकीय पार्टीची दिशा आणि दशा दाखवून दिली.त्यामुळेच कांशी तेरी नेक कमाई,तुने सोती कोम जगाई!.या घोषणेतील उर्जा निघून गेली.

मुझे पढे लिखे लोगोने धोका दिया असे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर खेदाने मत व्यक्त केले होते.पण त्याच पढे लिखे लोकांना संघटीत करून कांशीरामजी यांनी बामसेफ संघटना बनविली आणि त्याच्या कडून सक्तीने आर्थिक मदत मिळविली त्यातूनच त्यांनी डीएस फोर उद्ध४ दलित शोषित समाज संघर्ष समिती द्वारे समाजात जनजागृती केली.त्याची सुरुवात ही सायकलवरून झाली. ते कार्यकर्त्यांनां सांगत सायकल ही माझ्या साठी एकमात्र साधन आहे.ते केवळ साधनच नाही तर बहुजन मिशनचे सर्वात महत्वाचे साधन आहे. यावरच त्यांनी भारत भर सायकल यात्रा काढली. आज कार्यकर्त्यांच्या नेत्यांच्या घरी दोन तीन चारचाकी गाड्या आहेत तरी जिल्हाभर फिरण्याची तयारी नाही.कांशीरामजी यांनी आपल्या पन्नास वर्षात बहुजन समाजात जनजागृतीसाठी चाळीस दिवसात चार हजार किलोमीटर सायकलवरून यात्रा केली. देशातील नव्हे तर जगातील कोणत्याही समाज सुधारक,राजकिय नेत्याने असे धाडस केले नाही.त्यामुळेच बहुजन समाजात उत्स्पुर्तपणे घोषणा दिली जात होती.कांशी तेरी नेक कमाई,तुने सोती कोम जगाई!.

कांशीरामजी ने रात्र दिवस मेहनत करून वाढविलेली बसपा बहन मायावतीजी ने चमच्या लोकांच्या सल्ल्याने देशभरातील कॅडर बेस कार्यकर्ते संपवले.बहन मायावतीजी चे सर्व निर्णय अचूक असतील तर प्रत्येक राज्यात पक्ष संघटन का वाढत नाही?.वाढले नाही.यांची समीक्षा बैठक प्रामाणिकपणे झाली पाहिजे.कांशीरामजीने मायावतीवर जो विश्वास दाखविला त्याला तडा गेला आहे काय?. मिशनरी कार्यकर्त्यांना चमचा समजून पक्षातुन बेदखल करून बसपाचे न भरून येणारे नुकसान झाले आहे.काही चमच्यांना त्याच्या समाजाच्या विरोधात उभे केले जाते.तर मिशनरी कार्यकर्त्यांना त्यांच्या समाजाच्या हिता साठी उभे केले जाते.चमचा आपल्या समाजाच्या नेत्याला कमजोर बनवितो तर मिशनरी कार्यकर्ता आपल्या समाजातील सच्या नेत्याला मजबूत बनवितो. कांशीरामजीची संघटन कौशल्य आणि मायावतीजी चे संघटन कौशल्य यातील फरक आज प्रत्येक राज्यात दिसून येत आहे.गरीब प्रामाणिक,वक्तृत्व,कर्तृत्व आणि नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांची आज पक्षाला गरज नाही.त्यामुळे तो बाहेर फेकल्या गेला आहे. काही कार्यकर्ते नोकरी धंदा करायला लागले.तर काही वैफल्यग्रस्त झाले आहेत. त्यामुळेच कांशी तेरी नेक कमाई,तुने सोती कोम जगाई!.या घोषण पुन्हा पुन्हा समाजात कार्यकर्त्यात जोश निर्माण करण्यासाठी उपयोगी पडतांना दिसत नाही. कारण घोषणा देणारे इमानदार नाहीत.चमचागिरी करून पुढे आले आहेत,किंवा रोजगार हमीवर आहेत.

महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर लक्ष्मीपुत्र विलास गरुड यांनी एका ही तालुक्यात, जिल्ह्यात नेतृत्व निर्माण होऊ दिले नाही.एकाही विधानसभा,लोकसभा मतदारसंघात पक्षाचा पदाधिकारी उमेदवार हक्क सांगेल असा नेता निर्माण होऊ दिला नाही. मुलगा तरुण झाला,सुशिक्षित झाला म्हणून आईवडीलानां घराच्या बाहेर काढत नाही, वेळोवेळी त्यांचा मानसन्मान ठेऊन सल्ला घेतच असतो.पक्षात माजी अध्यक्ष झाला तर नवीन अध्यक्षांनी त्याला सोबत ठेऊ नये त्याला कोणत्याही कार्यात सहभागी करून घेऊ नये, आणि झाला तर त्यांची दखल घेऊ नये,ही पद्धत आज खुद्द गरुड बाबत वापरली जात आहे. म्हणजे निसर्गाचा नियम आहे,जे पेरले तेच उगवते. जे विचारधारा मानणारे कॅडर बेस कार्यकर्ते असतात ते कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्या पक्षात जाऊ शकत नाही. आणि गेले तर जास्त दिवस टिकू शकत नाही. एक वेळ पक्ष बदलला तर त्यांना समाजात काम करता येत नाही. मग ते सामाजिक,धार्मिक शैक्षणिक सांस्कृतिक कार्याकडे वळतात.तिथे ही त्यांना सारखा वैचारिक संघर्ष करावा लागतो.तिथे ही तो कांशी तेरी नेक कमाई,तुने सोती कोम जगाई!.अशा घोषणाचा विसर पडू देत नाही, बहुजन समाजात जनजागृती साठी प्रबोधन करण्यासाठी प्रयत्न शील असताॅच,

बहुजनांच्या म्हणजे मागासवर्गीय,ओबीसी,आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजाच्या कोणत्याही मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पक्ष व पक्षांचे कार्यकर्ते जनांदोलन करून न्याय मिळवून देण्यासाठी काम करत नसतील तर त्यांना निवडणूकीत मतदान मागण्याचा काय अधिकार आहे.महापुरुषांच्या नांवावर मत मागायचे तर त्यांनी ज्या असंघटित कष्टकरी मागासवर्गीय,ओबीसी,आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजाला सहा मूलभूत अधिकार मिळवून दिले अन्न,वस्त्र,निवारा, शिक्षण,रोजगार आणि आरोग्य त्याबाबत पक्षाच्या वतीने कोणतेच काम होत नाही. राज्य व केंद्रांच्या अनेक योजना या बहुजन समाजाला मिळत नाहीत.उच्चवर्णीय सरकारी अधिकारी आणि उच्चवर्णीय शासन मान्यता असलेले ठेकेदार या बहुजन समाजाचे मुक्त शोषण करतांना दिसतात.त्यातही राजकीय चमच्याची रोजीरोटी यांचे आर्थिक शोषण करूनच चालते.त्यावर महापुरुषांच्या विचारांचा वारसा सांगणारा पक्ष कोणता ही ठोस कृती कार्यक्रम राबवीत नाही.बहुजनांनी म्हणजे मागासवर्गीय, ओबीसी,आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजानी बसपाचा मतदार का राहावा आणि बसपाला मतदान का करावे?.यांचे अभ्यासपूर्ण आत्मचिंतन झाले पाहिजे.मान्यवर कांशीराम यांनी जागी केलेली कोम (बहुजन समाज) पुन्हा पुन्हा दिशाहीन होऊन का झोपतो. त्याची चिकित्सा झाली पाहिजे. त्यासाठी कांशी तेरी नेक कमाई तुने सोती कोम जगाई या घोषणाचा मान्यवर कांशीराम यांच्या स्मृती दिनी बहुजन समाजाला विसरता येणार नाही. मान्यवर कांशीरामजी यांच्या १९ व्या स्मृतीदिना निमित्त मान्यवर कांशीराम यांच्या क्रांतिकारी विचारांना व प्रतिमेला त्रिवार वंदन.विनम्र अभिवादन.

*******

सागर रामभाऊ तायडे,
९९२०४०३८५९,
भांडुप मुंबई.
अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य.

# वैद्यकीय सेवा?.

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील दैनंदिन जीवनामध्ये चढ उताराचा रस्ता चालत असताना विविध आजारांचा सामना प्रत्येक व्यक्तीला कमी जास्त प्रमाणात करावा लागतो.त्याच्या आयुष्यात वैद्यकीय सेवा घेण्यासाठी रुग्णालयात दाखल व्हावे लागते.औषध उपचारांच्यासाठी दवाखान्यात प्रसंगानुसा दाखल व्हावे लागते.दवा म्हणजे औषध आणि ती घेण्यासाठी विविध आजारांवर तज्ञ स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली औषध उपचार पद्धती घेण्यासाठी दवाखान्यात दाखल व्हावे लागते.दवाखान्यात डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आजारी व्यक्तीची सेवा किंवा देखरेख करण्यासाठी नियमितपणे वेळेनुसार औषध उपचार देण्यासाठी दवाखान्यात आरोग्य सेविका व सेवकांची.पगारी नियुक्ती करण्यात आलेली असते.

डॉ. प्रभाकर केले हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरे चे 'घडएड' बेळगाव येथे मला प्रायव्हेट सेक्सन बी ३ रुम नंबर ३०५ येथे वैद्यकीय सेवेसाठी दाखल करण्यात आले होते.सध्या माझं वय वर्षे ७२ (बात्तर) रनिंग चालू आहे.आजपर्यंतच्या इतर ठिकाणच्या दवाखान्यातील आलेल्या अनुभवा पेक्षा घश्रएड. दवाखान्यात प्रवेश केल्यापासून जी आदरयुक्त विचारपूस केली जाते.तसेच दावाखान्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पासून ते सर्वंच वैद्यकीय स्टाफ अगदी घरच्या रक्तातील नात्या पेक्षाही अधिक आपुलकीने, विचारपूस करून वेळच्या वेळी रात्रंदिवस परुग्णांची (दक्षता) काळजी घेतली जाते.त्यामुळे आजारी माणसाला झालेल्या आजारापासून बरं वाटायला मानसिकदृष्ट्या अधिक बळकटी किंवा प्रोत्साहन मिळते.तेथील एकंदरीत सर्व व्यवस्थापन.पाहून अंत्यंत समाधान मिळते.खरोखरचं मला मिळालेल्या सेवेबद्दल आणि आपुलकीने दिलेल्या बद्दल सर्वच स्टाफला माझा कोटी कोटी प्रणाम.

एक गोष्ट मात्र माझ्या मनाला चटके देत होती.दवाखान्यात दाखल करण्यात आलेल्या रुग्णांना ने आन करण्यासाठी ज्या महिला आहेत. त्या अत्यंत वयोवृध्द असल्याचे निदर्शनास आले.मी दवाखान्यात दाखल झाल्यानंतर खुर्चीवर बसवून ती खुर्ची ढकलून जी महिला नेत होती.तो प्रसंग पाहून मी त्या मावशीला विचारले आपल्याला मुलं आहेत का?. मग ती आपली सर्व परिस्थिती सांगू लागली. ते ऐकून मनात अनेक विचारांची घुसळण सुरू होवू लागली.घरातून आणलेला जेवणाचा डब्बा देखील खायला वेळ मिळत नाही.जेवतांना डब्बा येथेच ठेवून हाक दिली की जावे लागते.हे तिच्या तोंडून शब्द ऐकून मनात विचार आला की माणसाला परिस्थिती कारणीभूत ठरते.

इतर दवाखान्यातील आलेले अनुभव खाजगी दवाखान्यात दाखल होताच प्रथम आर्थिक परिस्थितीचा प्रथम अंदाज घेतला जातो.त्यांची शेती,उन्हाची म्हणजे बागायत जमिन,व्यवसाय,नोकरी यांच्या माध्यमातून त्याच्या आर्थिक उत्पन्नाचा अंदाज घेऊन मग पुढील टिटमेंट ठरविली जाते.वैद्यकीय अधिकाऱ्यांना दुसऱ्या निदान केंद्रात जाऊन निदान केलेले निदान रिपोर्ट चालत नाहीत.या मागचं गौडबंगाल काय?.वैद्यकीय अधिकाऱ्यांनी लिहून दिलेली औषधे त्यांच्याच मेडिकल मध्यून खरेदी करायची आणि ती औषधं त्यांच्या कर्मचाऱ्यांना दाखवून मगच बाहेर यायचे.मेडिकल,टेक्नॉलॉजी एक्सरे,प्रयोगशाळा सर्व कांहीं त्यांच्याच फक्त आपण सांगितलं त्या प्रमाणे भरलेला खिसा मोकळा करायचा एवढेच आपल्या हातात.बाकीचं नियोजन त्यांच्या हातात.कारण रिपोर्ट तयार करणारे आणि (लॅब वाले) लायब्रोट्रीवाले निदान किंवा रिपोर्ट तयार करून देणारे एकमेंकांच्या संगनमताने रिपोर्ट तयार करून रुग्णांचे आर्थिक शोषण करण्यासाठी मानसिक व भावनिक वातावरण निर्माण करत असल्याचे दिसून येते.शासनाने सर्व सामान्य माणसाला वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्या देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याचे दिसून येते.पण त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जी यंत्रणा सक्षम पाहिजे.ती दिसून येत नाही.

शासकीय रुग्णालयात आपली जबाबदारी टाळण्याचा जास्ती जास्त प्रयत्न केला जात असल्याचे निदर्शनास येते.शासकीय रुग्णालयातील यंत्रणा.जेणे करुन खाजगी दवाखान्यात पाठवून देण्यासाठी सर्रास प्रयत्न करत असतात.सदरच्या खाजगी रुग्णालयात दाखल होतानाच विचारले जाते आपणास येथे कोणत्या डॉक्टरांनी पाठवून दिले आहे.त्यांचे नांव काय आहे.याची कटाक्षाने नोंद घेतली जाते.आणि संबधित डॉक्टरांना पाठवून दिलेल्या रुग्णालयातील झालेल्या एकूण बिलातून ठरावीक रक्कम टक्केवारीत दिली जात असल्याचे समजते.आजकाल सर्रास हा व्यवसाय सुरू झालेला आहे.ज्यांची आर्थिक परिस्थिति चांगली आहे. त्यांनी दवाखान्यात दाखल व्हावे.नाही तर सर्व सामान्य माणसाला आजच्या परिस्थितीनुसार शेती जमिन घरदार विकायची पाळी येते.

अलीकडे शासकीय दवाखान्यात किंवा कांहीं खाजगी दवाखान्यात औषध उपचार घेण्यासाठी दाखल झाल्यानंतर तेथील रुग्णांच्या व्यवस्थेसाठी किंवा देखभालीसाठी पगारी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या कडून सर्व सामान्य रुग्णांना फार विचित्र अरे राविची वागणुक कांहीं ठिकाणीं अनुभवायला मिळत असल्याचे दिसून येते.आणि त्या वागणुकिला कंटाळून रुग्ण स्वतः हून खाजगी रुग्णालयाकडे वळतात. सर्व सामान्य माणसाला शासकीय रुग्णालयात सहानुभूती पुर्वक वागणुक मिळत नसल्यामुळें रुग्णालयातील रुग्णांना येणाऱ्या अनुभवांना सामोरे जावे लागते.अशा कर्मचाऱ्यांना सेवा या शब्दाचा अर्थाशी कांहीं देणं घेणं नसतो तर त्यांना टाईमपास करुन पगाराशी मतलब असल्याचे दिसून येते.तेथील अनुभव पाहून असे मनात विचार येतात.की यांची नियुक्ती रुग्णांची सेवा करण्यासाठी प्रामुख्याने केलेलीं आहे का?. पगार मिळतो म्हणून टाईमपास करण्यासाठी हा प्रामुख्याने प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे आजारी माणसांचा आजार कमी होण्याऐवजी स्वखर्चातून मानसिक ताण वाढून विकत आजार घेतल्याचं वाटायला लागते.

विविध शासकीय योजना! सर्व सामान्य नागरिकांना शासकीय योजनांच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्या*शासकीय योजनांच्या माध्यमातून होणारी शासकीय लूट ग्रामीण भागात प्रामुख्याने म्हणतात की शहाण्यांनी कोर्टाची आणि दवाखान्याची पायरी चढू नये.पण काय करणार म्हणतात ना!अडला नारायण धरी गाढवाचे पाय.अशी अवस्था झाली आहे. परिस्थितीनुसार माणसाला गाढवाचे ही पाय धरावें लागतात.शासनाने सर्व सामान्य माणसाची आर्थिक परिस्थिती नसलेल्या रुग्णांना रुग्णालयात सेवा घेता यावी म्हणून अनेक सुविधां शासनाच्या माध्यमातून विविध योजना चालू केलेल्या आहेत.पण कांही रुग्णालयामध्ये निदान केंद्र रुग्णालयाच्या निवासस्थानी आणि त्यांच्या नियंत्रणाखाली आणल्यामुळे बोगस रिपोर्ट तयार करून.सर्व सामान्य जनतेच्या नावावर शासकीय योजनांची लुटमार करीत असल्याची चर्चा सर्वत्र होत असल्याच्या शंका वर्तविली जात आहे.रूग्णालये ही वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वैज्ञानिक ठिकाण आहे.त्या ठिकाणी.सर्व सामान्य माणसाचा वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी प्रामुख्याने केला गेला पाहिजे.तसं न करता बऱ्याच ठिकाणी सर्व सामान्य माणसाला भावनिक तेच्या जाळ्यात अडकविण्यासाठी रुग्णालयात दाखल होतानाच समोरच्या बाजूला मोठ्या देव देवतांच्या मूर्ती दिसून येतात.यामुळे रुग्ण मानसिक दृष्ट्या भावनिक वातावरणाच्या आहारी जात असल्याचे दिसून येतात.

वैद्यकीय क्षेत्रातील शस्त्रक्रियापासून ते औषध उपचार पद्धती मध्यील सर्वस्वी तज्ञ वैद्यकीय अधिकारीच असू शकतात.शेवटी रुग्णांना सांगण्यात येते की माझ्या हातात जेवढं होतं तेवढं मी केलेले आहे.आता बाकीचे वरच्याच्या हातात म्हणून पळवाट शोधली जाते. वरच्याच्या. हातात सर्व काही असते ! तर रुग्णालयात दाखल व्हायची गरजचं काय? सर्वजण रुग्णालयात दाखल होण्या ऐवजीं मोठ मोठ्या मंदिरात रुग्ण दाखल झाले असते.बरं का ?.रुग्णालयामध्ये रुग्णांचे मानसिक मनोबल वाढवण्यासाठी प्रयत्न करणं गरजेचं असतांनाच काही रुग्णालयात रुग्णांचे मनोधैर्य खचिकरण करीत असल्याचे दिसून येते.माणसाला सर्व संकटातून वाचवणारा एकमेव धैर्य असतो.धैर्य खचला की त्याला कोणी वाचवू शकणार नाही.म्हणून धैर्य खचू न देणे सर्वात महत्वाचे आहे.ज्या गोष्टी अस्तित्वातचं नाहीत त्यांच्या पाठिमागे लावण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात असल्याचे दिसून येते.

वैद्यकीय क्षेत्रामध्ये रुग्णालयात रुग्णांची सेवा हाच मानवता धर्म माणून सेवा करण्याची खरी गरज आहे.सेवेच्या नावाखाली निव्वळ पैसा मिळविण्याच्या हव्यासापोटी रुग्णालयातील आर्थिक शोषण होताना दिसते.अरे माणसा माणसा या धरतीवर आपण सर्वजण चार दिवसाचे भाडोत्री आहोत याची जाणीव असू द्या!येताना मोकळे,जातानाही मोकळे. जिंवतपणी केलेले चांगले किंवा वाईट कर्म मागे ठेवून जाणार आहोत. जो जगासाठी जगला तो कायमचा कार्य रुपी जगला.जो स्वतः साठी जगता तो कायमचा मेला.तेंव्हा तूच ठरलं माणसा कोणासाठी जगायचं?. रुग्णांचे शोषण थांबविण्यासाठी उपाययोजना करणे काळाची गरज आहे.मानवतावादी दृष्टिकोनातून सेवेचं व्रत स्वीकारने आवश्यक आहे.

******

देशमुख पी.आर-
९९२१११९९५५

# भा. बौ. महासभा शाखा : जुईनगर वर्षावास मालिकेचा सांगता समारोह उत्साहात संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया आदर्श शाखा जुईनगरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वर्षावास धम्म प्रवचन मालिका २०२५ चे पुष्प क्रमांक एकोणीसावे मंगळवार दिनांक ०७ आक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी मूलगंध कुटी बुद्ध विहार, चिंचोली तलाव, सेक्टर २५ जुईनगर, नवी मुंबई येथे संपन्न करण्यात आले. सदर कार्यक्रमात विषय :- बुध्द, धम्म आणि मानवता (वर्षावास समाप्ती) प्रवचनकार समाज भूषण बौद्धाचार्य : बी. सी. सोनावले गुरुजी (माजी श्रामणेर, वरिष्ठ केंद्रीय शिक्षिक मुंबई), दानदाते आयुनी : दिपा दिलीप खरात व सहपरिवार शिरवणे सेक्टर १ नेरूळ यांनी केले बुध्द म्हणजे काय.? धम्म म्हणजे काय ? बुध्दाची मानवता अश्विनी पौर्णिमा - वर्षावास समाप्ती या विषयावर प्रवचनकारानी सखोल मार्गदर्शन केले. शाखेचे हिशेब तपासणी : अरुण आढाव गुरुजी






यांनी प्रस्ताविक केले. शाखेच्या अध्यक्षा : अलकाताई आढाव यांनी प्रवचनास अनुमोदन दिले, दानदाते : दीपाताई दीलीप खरात या परिवाराने दान देऊन खीरदान केली त्याचप्रमाणे प्रियंका थोरात यांनी अल्पोपहाराचे वाटप केले ज्या ज्या उपासक/उपासिका यांनी दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया जुईनगरच्या आदर्श शाखेला धम्मदान देऊन धम्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मदत करतात त्यांचा यथोचित जाहीर सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमात ज्वेल ऑफ लॉर्ड बुद्धा गार्डन नवी मुंबई या ठिकाणी (पत्रकार- बौद्धाचार्य) कल्याणराव हनवते यांच्यावतीने वर्षातील १२ पौर्णिमा म्हणजेच प्रत्येक महिन्यातील पौर्णिमा ही लॉर्ड बुद्धा पार्क या ठिकाणी साजरी करण्याचा जो संकल्प केला त्याबद्दल भारतीय बौद्ध महासभा शाखा जुईनगर अध्यक्ष आयुनी : अलकाताई आढाव यांच्या शुभ हस्ते बौद्धाचार्य- कल्याणराव हनवते यांचे जाहीर अभिनंदन केले. सरतेशेवटी शेवटी धम्मपालन व सरणतय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# अश्विन पौर्णिमा अर्थात संघ जयंती कशाप्रकारे साजरी करावी..!

## - पूज्य भदन्त : विमलकित्ती गुणसिरी

नवी मुंबई / के. एच. हनवते :- महानाग साक्यमुनि विज्ञासन भारतातील पहिली बुद्धिस्ट सेमिनरी आणि अखिल नवी मुंबई संयुक्त नागरी जयंती महोत्सव समिती व प्रबुद्ध सेवा संघ, आम्रपाली महिला मंडळ आयोजित वर्षावास मालीका धम्मकथिक प्रशिक्षण शिबीर समापन, कठीनदान समारंभ तसेच



अश्विन पोर्णिमा अर्थात संघ जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली सदर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक : पुज्य भदन्त : विमलकित्ती गुणसिरी यांनी उदबोधक धम्मदेसना देऊन उपस्थित लोकांना प्रेरणा दिली. अश्विन पोर्णिमा संघ जयंती कशा प्रकारे साजरी करावी यावर प्रकाश टाकला तसेच बौध्द समाज कर्माने कसा आदर्श बौद्ध समाज होईल याकरितां १) धम्मदीक्षा २) नामांतर ३) प्रत्येक आठवड्यांतून एकदा दर रविवारी उपोसथ अष्टशील ग्रहण करणे ४) दर रविवारी विहारात समाजाने एकत्रीत येणे. ५) आपल्या उत्पन्नाचा २० वा भाग दान देणे या विषयावर बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या पंचसूत्री कार्यक्रमावर अधिक भर दिला. तसेच पुज्य भदन्त विमलकित्ती गुणसिरी यांनी उपस्थितांना धम्मदीक्षा दिली, सदर कार्यक्रमाला जुईनगर, नेरुळ, बेलापूर, पनवेल, तसेच नवी मुंबई, ठाणे, कल्याण, मुंबई, नालासोपारा येथील उपासक /उपासिका शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.

# महिला बचत गटाच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देणार - सौ. संजीवनीताई कराड

लातूर :- महिला कुठेच मागे नाहीत विविध क्षेत्रात मोठी झेप घेत आहेत. घेतलेल्या कर्जाची परतफेड शंभर टक्के महिला बचत गट करतात. या बचत गटाच्या अडीअडचणीची सोडवणूक व्हावी, नियमित एकमेकांशी संवाद साधून प्रगती साधता यावी यासाठी महिला बचत गटासाठी स्वतंत्र कार्यालयासाठी आमदार रमेशआप्पा कराड साहेब यांच्याकडे पाठपुरावा करून जागा उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही सामाजिक कार्यकर्त्या भाजपा महिला आघाडीच्या सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांनी दिली.





महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र रेणापुर या संस्थेची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रेणापूर येथील रेणुकाई मंगल कार्यालयात बुधवारी भाजपा महिला आघाडीच्या सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी माविम विभागीय सल्लागार संदीप मराठे, जिल्हा समन्वय अधिकारी सोमनाथ लामगुंडे, जिल्हा ग्राम उद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे, आयसीआयसी बँकेचे राहुल लोंढे, महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या मेघा कुलकर्णी, एचडीएफसी बँकेचे भारत काळे, भाजपा पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, संगायोचे समिती अध्यक्ष सतीश आंबेकर, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे शरद दरेकर, दशरथ सरवदे, सावित्रीबाई फुले साधन केंद्राच्या अध्यक्षा सरस्वती पवार, उपाध्यक्षा अनुसया फड, व्यवस्थापक उषा डुमणे त्याचबरोबर अच्युत कातळे, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, सुरेखा पुरी, शीला आचार्य, उज्वल कांबळे, राजकुमार आलापुरे, रवींद्र नागरगोजे, श्रीमंत नागरगोजे, अंतराम चव्हाण, नारायण राठोड, उत्तम चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती. या वार्षिक सर्वसाधारण सभेत साधन केंद्रा अंतर्गत येणाऱ्या सभासद बचत गटाच्या असंख्य महिला आवर्जून उपस्थित होत्या. महिलांना कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात त्यासाठी प्रत्येक महिलांनी स्वस्थ राहण्यासाठी स्वतःची त्याचबरोबर कुटुंबाची काळजी घ्यावी असा मौलिक सल्ला देऊन बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी सक्षम व्हावे असे सांगून यावेळी बोलताना सौ. संजीवनी ताई कराड म्हणाल्या की, राज्यातील महायुती शासनाने महिलांसाठी अनेक योजना जाहीर करून महिलांना सन्मान देण्याचे काम केले आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तूंना उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर निश्चितपणे प्रयत्न केले जात आहेत या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित मान्यवरांनी विविध विषयाच्या अनुषंगाने महिलांना मार्गदर्शन केले त्याचबरोबर याप्रसंगी वार्षिक अहवाल पुस्तकेचे प्रकाशन आणि यशस्वी उद्योजक महिलांचा सन्मान करण्यात आला. सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र रेणापूर यांच्या अंतर्गत ४३२ महिला बचत गट असून या बचत गटा अंतर्गत ४७५२ महिला जोडल्या गेल्या आहेत. प्रारंभी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत साधन केंद्राच्या कार्यकारणी संचालक महिलांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्राचे सर्व पदाधिकारी क्षेत्रीय कर्मचारी यांनी मेहनत घेतली. या वार्षिक सर्वसाधारण सभेत हजारोंच्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## उकिर्ड्याच्या खड्यात साचलेल्या पाण्यात बुडून पहिलीच्या विद्यार्थिनीचा मृत्यू

केज/प्रतिनिधी तालुक्यातील चिंचोलीमाळी येथील बजगुडे वस्तीवर घराशेजारी उकिरड्यासाठी खोदण्यात आलेल्या खड्यात साचलेल्या पाण्यात बुडून नाका, तोंडात पाणी जाऊन आर्या अमोल बजगुडे वय ७ बर्षे या पहिलीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीचा मृत्यू रविवारी सायंकाळी झाला आहे.



रविवारी शाळेला सुट्टी असल्यामुळे आर्याला बजगुडे वस्ती येथील घरी ठेवून आई, वडील घराशेजारीच असलेल्या शेतात कामाला गेले होते. दरम्यान रविवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान आर्या अमोल बजगुडे ७ वर्षे रा. बजगुडे वस्ती ही घराजवळ उकिरड्यासाठी खोदलेल्या खड्यात साचलेल्या पाण्यात पडल्याचे तिच्या आईच्या लक्षात येताच, त्यांनी तीला खड्यातील पाण्यातून बाहेर काढून तात्काळ केज येथील उपजिल्हा रुग्णालयात घेवून गेले आसता नाका, तोंडात पाणी जाऊन आर्याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले. आर्या ही केज येथील विवेकानंद इंग्लिश स्कूल ला पहिलीच्या वर्गात शिक्षण घेत होती. तिच्या दुर्दैवी निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## घाईगडबडीच्या वेळी सकाळच्या नाश्त्यासाठी झटपट बनवा उत्तपम, आरोग्यासाठी ठरेल पौष्टिक पदार्थ

सकाळी उठल्यानंतर प्रत्येकाची घाई असते. लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं सकाळच्या नाश्त्यात अतिशय चविष्ट पदार्थ लागतात. नेहमीच कांदापोहे, उपमा, शिरा किंवा डोसा खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा होते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला उत्तम बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. लहान मुलांना भाज्या खायला आवडत नाही. अशावेळी तुम्ही मुलांना भाज्यांपासून बनवलेले वेगवेगळे पदार्थ खाण्यास देऊ शकता. दक्षिण भारतात सकाळच्या नाश्त्यापासून ते अगदी रात्रीच्या जेवणापर्यंत प्रत्येक पदार्थ बनवताना तांदळाचा वापर केला जातो. याशिवाय तिथे डोसा, इडली हे पदार्थ नाश्त्यात कायमच खाल्ले जातात. वेगवेगळ्या भाज्यांचा वापर करून बनवलेला चविष्ट पदार्थ सगळ्यांचं खूप जास्त आवडेल. चला तर जाणून घेऊया उत्तम बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: डोसा बॅटर कांदा टोमॅटो हिरवी मिरची लाल तिखट मीठ कोथिंबीर मोहरी कढीपत्ता तेल कृती: उत्तपम बनवण्यासाठी सर्वप्रथम, सर्व भाज्या स्वच्छ धुवून बारीक चिरून घ्या. भाज्या चिरून झाल्यानंतर एकत्र करून मिक्स करा. नॉनस्टीक पॅनवर तेल टाकून सारंगळीकडे व्यवस्थित पसरवून घ्या. त्यानंतर त्यावर डोसाचे गोलाकार मिश्रण टाकून पसरवून घ्या. तयार केलेल्या डोसावर बारीक चिरून घेतलेल्या भाज्या घालून सगळीकडे पसरवून घ्या. त्यानंतर त्यावर लाल तिखट, चवीनुसार मीठ आणि बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. तयार केलेला उत्तम फिरवून हलकासा दाबून घ्या.

## लातूर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

### १४ ऑक्टोबरपर्यंत हरकती सादर करण्याचे आवाहन

लातूर :- महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार लातूर जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्यांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी संबंधित तहसील कार्यालयांमध्ये नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी या प्रारूप मतदार यादीचे अवलोकन करावे. तसेच यादीबाबत काही हरकती किंवा सूचना असल्यास त्या १४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत लातूर जिल्हाधिकारी कार्यालय अथवा संबंधित तहसील कार्यालयात सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## कोजागिरी पौर्णिमा निमित्त मसाला दूध, अल्पपोहार व सुरसंगम महीफिल कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी केज शहरातील समर्थ नगर भागामध्ये शारदीय नवरात्र उत्सव, कोजागिरी पौर्णिमा निमित्त मसाला दूध,अल्पोपहार व सुरसंगम महिफिल कार्यक्रमाचे आयोजन जनविकास फाउंडेशन व शिवशंभू युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त जनविकास फाउंडेशन व शिवशंभो युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात आले यामध्ये कोजागिरी पौर्णिमे दिवशी मसाला दूध, अल्पोपहार व सुरसंगम महिफिल कार्यक्रम मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमांमध्ये केज शहरासह तालुक्यातील युवक- युती,महिला, नागरिक यांनी मोठ्या संख्येने



सहभाग नोंदवून कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार,नगराध्यक्षा सीताताई बनसोड, गटनेते राजूभाई इनामदार, प्राचार्य राहुल भैया गदळे, नगरसेवक जलालभाई इनामदार, नगरसेविका सौ.पद्मिनी अक्का शिंदे, पत्रकार अशोक सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते संजूबाबा लोंढे, गणेश खराडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे नियोजन हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे अध्यक्ष बालाजी शेवाळे यांच्यासह यांच्या सहकार्यांनी चांगल्या प्रकारे केले होते. या कार्यक्रमास केज शहरासह तालुक्यातील सामाजिक, राजकीय, सांप्रदायिक, शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवर व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आणि जनविकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानचे केज तहसील कार्यालयासमोर आंदोलन

संविधानाच्या चौकटीत राहून आंदोलन करा जेणेकरून कोणाच्याही जिवीतास धोका निर्माण होणार नाही असे केज तहसीलदार राकेश गिड्डे यांनी सांगितले.

कोरडेवाडी येथे राजश्रीताई उमरे पाटील यांचे सहा दिवसापासून उपोषण चालू आहे जर उपोषणाची व आमच्या मागण्याची दखल प्रशासनाने घेतली नाही तर यापुढे उग्र स्वरूपाचे आंदोलन करु बाळराजे अवारे पाटील



केज/प्रतिनिधी :- केज तालुक्यातील कोरडेवाडी येथे मागील सहा दिवसापासून राजश्रीताई उमरे पाटील या विविध मागण्या संदर्भाने उपोषणास बसलेल्या आहेत त्या अनुषंगाने धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या वतीने केज तहसील कार्यालया समोर आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात आंदोलनकर्त्यांन कडून बैलगाडी पेटविण्यात आली परंतु महसूल प्रशासन व पोलीस कर्मचारी यांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टाळला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील कोरडेवाडी येथे धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या राजश्रीताई उमरे पाटील या मागील सहा दिवसापासून उपोषणास बसलेल्या आहेत परंतु प्रशासन स्तरावरून असल्यास प्रकारची दखल घेण्यात आली नाही म्हणून धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य, चे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ८ ऑक्टोंबर २०२५ रोजी केज तहसील कार्यालयाच्या प्रांगणामध्ये आंदोलन केले या आंदोलनामध्ये एक बैलगाडी पेटवून देऊन आंदोलन करण्यात आले परंतु महसूल प्रशासनातील अधिकारी व पोलीस प्रशासनातील अधिकारी कर्मचारी यांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टाळला आहे. यावेळी संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या नेतृत्वाखाली केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे यांना निवेदन देण्यात आले आहे. सदर निवेदनात असे म्हटले की, केज तालुक्यातील कोरडेवाडी येथे साठवन तलाव असून तेथे पाणी उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे, सध्या ओला दुष्काळ जाहीर करण्यात आलेला असून शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर ५० हजार रुपये प्रमाणे मदत तात्काळ देण्यात यावी, ज्ञानराधा बँकेत ज्या ठेवीदारांच्या ठेव रकमा अडकल्या आहेत, त्यांची त्वरित वसली करून किंवा पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून निधी परत देण्यात यावा, विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करण्यात यावी व शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करण्यात यावी अशी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानच्या वतीने तहसीलदार केज यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. तसेच सदर मागण्या संदर्भाने धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानच्या वतीने राजश्रीताई उंमरे पाटील या मागील सहा दिवसापासून कोरडेवाडी येथे उपोषणास बसलेल्या आहेत. मात्र आज पर्यंत शासनाचा कोणताही प्रतिनिधी त्या ठिकाणी भेटण्यासाठी आलेला नाही असा आरोप सदर दिलेल्या निवेदनात आंदोलनकर्त्यांनी केलेला आहे. या लेखी निवेदनावर संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील, संभाजी आघाव, संदीप चाळक, सौ.ज्योतीताई सपाटे,ड. प्रणित डिकले, पुष्पक देशमुख इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत

# केज तहसील कार्यालयावर उबाठा गटाचे आंदोलन

### शेतकऱ्यांना प्रत्येकी हेक्टरी ५० हजार रुपयाची तातडीने मदत देण्यात यावी.

केज/प्रतिनिधी :- केज तहसील कार्यालयावर उभाठा गटाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांना प्रत्येकी हेक्टरी ५० हजार रुपयाची तातडीने मदत देण्यात यावी व शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी यासह विविध मागण्या संदर्भात केज तहसील कार्यालयावर आंदोलन करून नायब तहसीलदार अशोक भंडारे यांना निवेदन देण्यात आले. शिवसेना पक्ष उद्धव साहेब ठाकरे व शिवसेना नेते अंबादास दादा दानवे,उपनेत्या सुषमाताई अंधारे,संपर्कप्रमुख परशुराम जाधव,सहसंपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे, मा. जिल्हाप्रमु रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या आदेशावरून तहसील कार्यालय केज येथे तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली केज तालुक्यातील शेतकऱ्यांची संपुर्ण कर्जमुक्ती, शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५० हजार रुपये अनुदान पिकविम्याचे बोगस निष्कर्ष बंद करणे,पडझड झालेली घरे व मृत पावलेल्या पशुधनासाठी भरघोस मदत मिळावी यासह विविध माग्यासाठी घरणे आदोलन, निदर्शने करण्यात आले. या वेळी शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शील पालन हा नीतिमत्तेचा पाया आहे - भिक्खु पय्यानंद थेरो

## कठीण चिवरदान, वर्षावास समापन सोहळा उत्साहात संपन्न.

लातूर :- तथागत भगवान बुद्धाची शिकवण ही प्रज्ञा, करुणा, मैत्री आणि सद्गुण शील सदाचाराची आहे. मानवी समाज हा नैतिकतेने प्रगत होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्वार्थाने नैतिक गुणाचे पालन जबाबदारीने प्रत्येक स्त्री-पुरुषांनी करणे आवश्यक आहे. नैतिक गुणाचे पालन करणे म्हणजेच शील पालन करणे होय आणि म्हणूनच शील पालन हा नीतिमत्तेचा पाया असल्याचे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित महाविहार धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव ता. जि. लातूर येथे अश्विन पौर्णिमे निमित्त वर्षावास समापन व धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते. प्रारंभी पवित्र बोधी वृक्षाची पूजा करून प्रतिकात्मक बौध्द चैत्य स्तुपाची भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली.तद्यनंतर महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिशरण पंचशील व सामूहिक बुध्द वंदना घेण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रशांत दाणी (मुख्य अभियंता, लातूर), डॉ. बाबासाहेब शेंडगे, भा. बौ. महासभेच्या जिल्हाध्यक्ष आशाताई चिकटे, वंचित बहुजन आघाच्या शहराध्यक्ष सुजाता अजनिकर हे उपस्थित होत्या. यावेळी डॉ. सतीश डोंगरे, प्रा. यु. डी. गायकवाड, पूनम दाणी, ललिता गायकवाड, मंगल सुरवसे यांच्या सह प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी आशा चिकटे, कविता कदम, प्रतिभा आदमाने, सुजाता अजनिकर, कल्पना कांबळे, विलास अवशंक आदी जनाकडून भिक्खु संघास कठीण चिवरदान करण्यात आले. बौद्ध धर्मात अश्विन पौर्णिमा ही वर्षावासातील अंतिम पौर्णिमा म्हणून महत्त्वाची आहे, कारण या दिवशी वर्षावास (पावसाळ्यातील भिक्षूंचा एकाच ठिकाणी साधना करण्याचा काळ) संपतो. पाली भाषेत या पौर्णिमेला 'अस्सयुज मासो' म्हणतात आणि याला बौद्ध धम्माच्या प्रसाराच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण मानले जाते, कारण या पौर्णिमेनंतर धम्माचा प्रचार सुरू केला जातो. वर्षावास हा पावसाळ्यात भिक्षूंसाठी एका ठिकाणी साधना करण्याचा काळ असतो आणि अश्विन पौर्णिमेला वर्षावास संपतो. अश्विन पौर्णिमा ही धम्म प्रचार व प्रसाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जाते. तथागतांनी आपल्या भिक्षूंना धम्म प्रचार करण्यासाठी 'चरथ भिक्खवे चारीकं...' असा उपदेश याच पौर्णिमेनंतर दिला होता असेही ते म्हणाले. यावेळी श्रमन बाबासाहेब शेंडगे या छोटया बालकाने बुद्ध धर्मातील विविध गाथांचे पठण करून उपस्थितांची मने जिंकली. पुढे बोलताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, मानवी जीवनात शील पालनाचे अतिशय मोठे स्थान आहे. शील म्हणजे नैतिक शिस्त, चारित्र्य आणि संयमाचे पालन होय. शीलाचे बल अप्रतिम आहे, कारण ते माणसाला वाईट प्रवृत्तीं पासून दूर ठेवते आणि सदाचाराच्या मार्गावर नेते. शीलाचे पालन केल्याने मनाची शुद्धी होते, आत्मविश्वास वाढतो आणि जीवनात शांतता प्राप्त होते. शीलाचे अस्त्र हे उत्तम असते, कारण ते आपल्याला वाईट विचारांपासून आणि कर्मांपासून रक्षण करते. शील हे जीवनाचा अलंकार आहे, जे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला तेज देतं. शील पालनामुळेच माणसाला सुगती, संपत्ती आणि शेवटी निर्वाण - म्हणजेच सर्वोच्च शांती - प्राप्त होते. म्हणूनच शील हे मानव जीवनाचे भक्कम अधिष्ठान असून, प्रत्येकाने ते आचरणात आणावे हीच खरी बुद्धांची शिकवण आहे. असेही भंतेजी यांनी यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. दुश्यंत कटारे यांनी केले तर आभार निर्मला गौरकर यांनी मानले. या वेळी महामाया उपासिका संघ, सिद्धार्थ सोसायटी यांच्यावतीने भोजन दान देण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी भंते बोधिराज, मिलिंद धावारे, ज्योतीराम लामतुरे, सतीश मस्के, अनिरुद्ध बनसोडे, उदय सोनवणे, करण ओव्हाळ, अविनाश आदमाने, कृष्णा सुरवसे, नवनाथ कांबळे, गौतम आदमाने सह धम्म सेवक ग्रुपच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न केले. या प्रसंगी भीमराव चौदंते, आर. पी. गायकवाड, ये पी कांबळे, सत्यप्रकाश कांबळे, डॉ. अरुण कांबळे, अशोक कांबळे, अंतेश्वर थोटे, पांडुरंग अंबुलगेकर, सुधाकर कांबळे, उत्तम कांबळे, टी. एस. कवठेकर, सूर्यभान लातूरकर, निर्मला थोटे, शामल कांबळे, पंचशीला बनसोडे, मंगल सुरवसे, ललिता गायकवाड, पुष्पा बोडके, विजया गायकवाड, अंजली कांबळे, मयुरी आल्टे, सरिता बनसोडे, पंचशीला भडके, भाग्यश्री सावंत यांच्या सह समाजातील प्रतिष्ठित मान्यवर, विविध नगरातील महिला मंडळ, उपासक उपासिकांची लक्षवेधी उपस्थिती होती.







## लातूरमध्ये वाहतूक शिस्तीकरिता विशेष मोहीम : १६७ ॲटोरिक्षाचालकांवर कारवाई

लातूर / प्रतिनिधी :- लातूर शहरातील वाढत्या वाहतूक समस्येवर आळा घालण्यासाठी आणि नियमांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी वाहतूक विभागाकडून विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत ॲटोरिक्षाचालक आणि इतर वाहनचालकांवर कठोर कारवाई केली जात आहे. ही मोहीम पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून आणि अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली, वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत आहे. विशेष लक्ष ॲटोरिक्षाचालकांकडे लातूर शहरात ॲटोरिक्षांची संख्या प्रमाणापेक्षा जास्त असून अनेक चालक वाहतूक नियमांचे उल्लंघन करतात. फ्रंटशिटवर प्रवासी घेणे, गणवेश न परिधान करणे, मनमानी ठिकाणी थांबून प्रवासी चढ-उतार करणे, दुहेरी रांगेत रिक्षा लावणे अशा प्रकारांमुळे वाहतूक कोंडी आणि नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने कारवाईचा धडाका लावला असून आतापर्यंत १६७ ॲटोरिक्षाचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. या चालकांकडून १,१८,६५०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ओव्हर स्पीड वाहनांच्या ४७ केसेसमध्ये ९४,०००/- दंड आकारण्यात आला आहे. कायद्याखालील कारवाई विना परवाना (Permit) शहरात प्रवास करणाऱ्या बाहेरील ॲटोवर मोटार वाहन कायदा कलम ६६(१)/१९२ अंतर्गत खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच प्रमुख चौकांमध्ये ५० मीटर अंतराच्या आत थांबणारे आणि वाहतूक अडथळा निर्माण करणाऱ्यांवर भारतीय दंड संहिता कलम २८५ अंतर्गत गुन्हे नोंदवले जात आहेत. नागरिकांना आवाहन वाहतूक विभागाने शहरातील सर्व ऑटोरिक्षा वाहनचालकांना आवाहन केले आहे की - फ्रंटशिटवर प्रवासी घेऊ नये, गणवेश परिधान करावा, ठरलेल्या ठिकाणीच प्रवासी चढ-उतार करावेत, नो पार्किंग / नो स्टॉपिंग क्षेत्राचे पालन करावे, मोठ्या आवाजाचे सायलेंसर बसवू नयेत, वाहनाची सर्व कागदपत्रे सोबत बाळगावीत, आणि वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे टाळावे. वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी सांगितले की, लातूर शहरातील वाहतूक शिस्त राखण्यासाठी ही मोहीम सातत्याने सुरू राहील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल.

## कपिलवस्तू बुद्ध विहार येथे वर्षवास मालिकेचा सांगता समारोह उत्साहात संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :- कपिलवस्तू बुद्धविहार सेवा समिती, बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ५१४, रमाई महिला संघ, आणि कपिलवस्तू बुद्ध विहार महिला संघ सेक्टर १० यांच्या विद्यमाने आषाढ पौर्णिमेला सुरू झालेला वर्षवास मालिका अश्विन पौर्णिमेला सांगता समारोह मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे मुख्य प्रवचनकार : भंते करुणानंद यांनी आपल्या मंगल वाणीने सर्व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले भंते करूणानंद यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, गौतम बुद्धांनी सांगितलेल्या त्रिशरण, पंचशील आणि अष्टांगिक मार्गाच्या आचरणामुळे जीवन अधिक सुसंगत आणि जागृत बनते, बौद्ध धम्म हा नैतिकतेने जीवन जगण्याची एक प्रभावी कला आसुन यामुळे समाजात समता, करुणा, आणि बंधुततेचा विकास होतो. वर्षावास हा बौद्ध परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचा कालखंड आहे ज्यामध्ये भिक्खू पावसाळ्यात एकास्थानी स्थिर राहून बौद्ध उपासक उपासीकांना ध्यान साधना आणि धम्माचे शिक्षण देतात. सदर कार्यक्रमास स्वागताध्यक्ष महेश खरे (आरपीआय) नवी मुंबई जिल्हाध्यक्ष, तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकांत धोत्रे हे होते, सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक: एल. आर. गायकवाड (कपिल वस्तू बुद्ध विहार सरचिटणीस) यांनी केले, सदर कार्यक्रमास गोपाळ जाधव, अशोक मोहिते, राजेश गंगावणे इत्यादी कार्यकर्ते पदाधिकारी यांनी गेल्या तीन महिन्यापासून वर्षवास मालिका कार्यक्रमाचे परिश्रम घेत आले आहेत, या संपूर्ण कार्यक्रमाचा धम्मविधी : महेंद्र कदम यांनी केले असून या कार्यक्रमाचे भारदस्त सूत्रसंचालन : सचिन मोरे यांनी केले. सदर कार्यक्रमास नेरूळ विभागातील बौध्द उपासक उपासिका, लहानथोर बॉलक, बालीका यांनी शेकडोंच्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली, सरते शेवटी धम्मपालन आणि सरणतय गाथा घेऊन कार्यक्रम संपन्न केला, शेवटी सर्वांनी मनसोक्त स्नेह भोजनाचा आनंद घेतला.



## फिजिओथेरपी आरोग्य सेवेचा अविभाज्य घटक डॉ. संदीप कडू; एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर पदवी समारोप समारंभ

लातूर : - वैद्यकीय क्षेत्रात फिजिओथेरपी ही शाखा अतिशय महत्वाची असून या शाखेची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. करिअरच्या दृष्टीकोणातून ही शाखा तरुणांसाठी फायद्याची ठरत आहे. वैद्यकीय क्षेत्रातील इतर शाखांप्रमाणेच फिजिओथेरपी ही आरोग्य सेवेचा अविभाज्य घटक आहे, असे मत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे परिक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी व्यक्त केले. एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयात आयोजित १७ व्या बीपीटीएच पदवी व एमपीटीएच पदव्युत्तर पदवी समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संदीप कडू बोलत होते. यावेळी विवेकानंद रुग्णालय व संशोधन केंद्रातील फिजिओथेरपी विभाग प्रमुख डॉ. हर्षा मंत्री, संरक्षक तथा कार्यकारी संचालक प्रा. तेजस कराड, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांची प्रमुख उपस्थिती होती. बीपीटीएच पदवी व एमपीटीएच पदव्युत्तर पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांवर भविष्यात आरोग्य सेवेची मोठी जबाबदारी आहे. रुग्णांवर उपचार करताना नियमांचे पालन आणि आपलेपणाची भावना राखणे गरजेचे असल्याचे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. कडू म्हणाले की, पदवी मिळाल्यानंतर शिक्षण संपत नाही; तर पुढे नव्या शिक्षणाची सुरुवात असते. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेऊन संशोधन, शिक्षण आणि आरोग्य सेवेत योगदान द्यावे. जिवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्त, वेळेचे नियोजन आणि दिनचर्येत समतोल राखावा. त्याचबरोबर ताण तणावमुक्त जीवनासाठी अभ्यासाबरोबर आवडीचे छंद जोपासून योग, प्राणायाम आणि व्यायामाचा दिनचर्येत समावेश करावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना डॉ. हर्षा मंत्री म्हणाल्या की, फिजिओथेरपी पदवीधरांनी विविध आजारांचे स्वरूप लक्षात घेऊन वेगवेगळ्या शाखांमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेणे आवश्यक आहे. सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन रुग्णसेवा करणे हे प्रत्येक फिजिओथेरपिस्टचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना प्रा. तेजस कराड म्हणाले की, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातून बाहेर पडलेले विद्यार्थी आरोग्य सेवेत उल्लेखनीय कार्य करत आहेत. प्रत्येकाने प्रामाणिकपणे सेवा देत नव शिक्षण व संशोधनावर भर द्यावा. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. सुभाष खत्री म्हणाले की, विद्यार्थ्यांनी बीपीटीएच अभ्यासक्रमात आत्मसात केलेले ज्ञान रुग्णसेवेसाठी उपयोगात आणावे. देश-विदेशात फिजिओथेरपिस्टची मोठी मागणी असून अत्याधुनिक तंत्रज्ञान व ज्ञान आत्मसात करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. यावेळी बीपीटीएच पदवीची विद्यार्थीनी इशा पाटील, दिव्या जगताप व पालक सत्यनारायण गुर्रम यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी चारही वर्षात विशेष गुवत्तेने उत्तीर्ण झाल्याबद्दल पदवीधर विद्यार्थीनी आकांक्षा गट्टाणी व पदव्युत्तर विद्यार्थीनी डॉ. अभिलाषा मुंदडा यांना श्रीमती उर्मिलादेवी कराड या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. या समारंभात मान्यवरांच्या हस्ते ४५ पदवीधर व ११ पद्व्युत्तर विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. प्रारंभी डॉ. झिशान महमंद यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य सेवेची शपथ दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाखा सुरवसे व विशाखा गाडेकर यांनी केले तर डॉ. रिशा कांबळे यांनी आभार मानले. पदवीदान समारंभास डॉ. आर. एम. सिंगरावेल्लन, डॉ. गौरव भटनागर, डॉ. विश्वनाथ पावडशेट्टी, डॉ. संगीता सिंगरावेल्लन, डॉ. शितल घुले, डॉ. श्रुती ताडमारे, डॉ. काजल चौहान, डॉ. पवन कुमार, डॉ. प्रमोद गायसमुद्रे, डॉ. अनिल साठे, डॉ. सलीम शेख, डॉ. स्मिता मुंडे, डॉ. प्रतिक्षा लंके यांच्यासह विद्यार्थी, शिकेत्तर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येनी उपस्थित होते.




## लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने निषेध मोर्चा काढून सर्वोच्च न्यायालयातील घटनेचा निषेध

लातूर : दिल्ली येथील सर्वोच्च न्यायालयात भारताचे सरन्यायाधीश भूषण आर. गवई यांच्यावर न्यायदान कक्षेमध्ये झालेल्या हल्ल्याच्या घटनेचा निषेध म्हणून, बुधवार, दि. ८ ऑक्टोबर २०२५ लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने मूक मोर्चा काढण्यात आला. दर मोर्चा सकाळी ११.३० वाजता लातूर न्यायालय परिसरातून निघून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संपन्न झाला. या मोर्चामध्ये सर्व वकील बांधवांनी एकजुटीने सहभाग नोंदविला. लाल फिती लावून वकील बांधवांनी शांततेत आपला निषेध नोंदविला. या मोर्चाच्या माध्यमातून, सर्वोच्च न्यायालयासारख्या पवित्र न्यायसंस्थेतील अशा प्रकारच्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला असून, न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा व सुरक्षितता अबाधित ठेवण्याची मागणी करण्यात आली. मोर्चा शांततेत व शिस्तबद्ध रीतीने पार पडला. दि.०७ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत या घटनेचा निषेध करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता, आज दिवसभर वकील बांधवांनी लाल फित लावून कामकाज केले. या मोर्चामध्ये लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. योगेश डी जगताप, महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. आण्णाराव पाटील, लातूर जिल्हा वकील मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. संजय जगदाळे, महिला उपाध्यक्ष ॲड. मनीषा दिवे पाटील, सचिव ॲड. गणेश गोजमगुंडे, ग्रंथालय सचिव ॲड. प्रणव रायपूरकर, सहसचिव ॲड. निलेश मुचाटे, महिला सहसचिव ॲड. अभिलाषा गवारे, कोषाध्यक्ष गणेश कांबळे तसेच ॲड. उदय गवारे, ॲड. गंगाधर कोदळे, ॲड. लहू सुरवसे, ॲड. राजकुमार गंडले, ॲड. शिवकुमार बनसोडे, ॲड. गोविंद शिरसाट, ॲड. नागनाथ बद्दे, ॲड. एम डी ठाकूर, ॲड. उगीले, ॲड. सुनंदा मोटे इंगळे, ॲड. इरफान शेख , ॲड. हनुमंत वैजाळे, ॲड. सोमेश्वर बिराजदार, ॲड. कोमल राठोड, ॲड. दौलत दाताळ , ॲड. निखिल काळगे, ॲड. शिल्पा शहादाद पुरी, ॲड. अनिल चुणगुणे, ॲड. नितीन राठोड , ॲड. दीपक माने व लातूर जिल्हा वकील मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.






## राकेश किशोर यांची सनद रद्द करून त्यांना अटक करा-फकिरा ब्रिगेडची मागणी

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :- सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर चप्पल फेकणा-या राकेश किशोर यांची सनद रद्द करून त्यांना कडक शिक्षा द्यावी अशी मागणी फकिरा ब्रिगेड या संघटनेने देशाचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून भूषण गवई विराजमान झाले तेव्हा पासूनच मनुवाद्याचे पोटसुळ उठले आहे.त्यांना सगळीकडेच उच्चवर्णीय लोक पाहिजे आहेत त्यात भुषण गवई यांच्यासारखे सर्व धर्म समभाव मानणारे, संविधानाला प्रमाण मानणारे, लोकशाहीला सर्वस्व मानणारे कर्तव्यदक्ष न्यायमूर्ती भूषण गवई हे बौध्द असल्याने त्यांच्यावर हल्ला केला.भुषण गवई यांच्यावर झालेला हल्ला हा लोकशाहीवर केलेला हल्ला आहे.भारतातील शेवटच्या माणसाचे संरक्षण करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाची आहे.असे असतांना सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीवर असा हल्ला होणे हे भ्याडपणाचे लक्षण आहे.त्यामुळे राकेश किशोर यांची वकीलीची सनद तात्काळ रद्द करून त्यांना अटक करावी आणि कडक शिक्षा करावी अशी मागणी फकिरा ब्रिगेडच्या वतीने महामहीम राष्ट्रपती, उपराष्ट्रपती,देशाचे पंतप्रधान यांच्याकडे केली आहे.या निवेदनावर प्रा.डॉ. संजय शिंदे,प्रा.राजेंद्र लोदगेकर, संजय विरूळे, रणजित मिसाळ,बी.आर.पारस्कर, मच्छिंद्र खंदारे, बाबासाहेब नवगिरे, संतोष पटनुरे, अंकुश कांबळे, संजय भालेराव, बाळू लोखंडे, पांडुरंग मस्के, सतीश मस्के, विकास राऊत आदी कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE